अनुसूचित जातीसाठी भारत सरकार
मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क परीक्षा
शुल्क देण्याची योजना - कार्यपध्दतीबाबत.

## महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक-इबीसी-२००३/प्र.क्र.३०१/मावक-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक : १ नोव्हेंबर, २००३

<u>प्रस्तावना</u> : भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना ही १९५९-६० पासून राज्य शासनाकडे केंद्र शासनाकडून हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. या योजनेखाली अनुसूचित जातीच्या (बौद्धांसह) विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमानुसार रु. ९०/- ते ४२५ /- या दराने निर्वाह भत्ता अदा केला जातो. याबरोबरच शिक्षण फी, परीक्षा फी व कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयाची देय असलेली इतर फी प्रतिपूर्ती केली जाते. या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून बांधील खर्चाच्या वर येणाऱ्या खर्चाच्या १०० टक्के अनुदान मंजूर करण्यात येते. महागाई निर्देशांकानुसार केंद्र शासनाकडून दर दोन वर्षांनी या योजनेकरीता उत्पन्नाची मर्यादा वाढविण्यात येते. सध्या सदर योजनेखाली विद्यार्थ्यांच्या पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु.४९,०००/- व रु. ६५,२९०/- एवढी निश्चित करण्यात आलेली आहे.

२ मान्यताप्राप्त सर्व स्तरावरील शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क शिक्षण विभागाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे सवलत प्रदान करण्यात येते. तथापि, बऱ्याच शैक्षणिक संस्थांकडून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क वसूल करण्यात येते, असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे याबाबत कार्यपध्दती ठरविण्याची आवश्यकता आहे.

३ भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती या योजनेखाली विविध शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयाकडून शिष्यवृत्तीसाठीचे प्रस्ताव जिल्हा स्तरावर विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे प्राप्त होतात. सध्याच्या काळात विद्यार्थी संख्या व महाविद्यालयांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रस्तावांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असल्याने त्याची छाननी करणे, देयक तयार करणे, कोषागारातून रक्कम पारीत करणे व धनाकर्षाव्दारे महाविद्यालयाकडे [illegible] करुन त्यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा



Dadasaheb Jotiram Godse Arts, Commerce, Science College
VADUJ
Tal. Khatav
Dist. Satara

Principal
Dadasaheb Jotiram Godse
Arts, Commerce, Science College, Vaduj
Tal. Khatav, Dist. Satara (MH)

Scanned with CamScanner

शुल्क रक्कमेचे वाटप करण्यास अनेकवेळा विलंब होतो. यामुळे विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता वेळेवर न मिळाल्याने त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. काही वेळा विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळाली नाही म्हणून निवेदने, आंदोलने अशा मार्गाचा अवलंब करतात. यासाठी शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क वाटप योजनेत सुलभता आणून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क वेळेवर देण्यासाठी महाविद्यालय स्तरावरच शिष्यवृत्ती मंजुरीचे अधिकार प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : अनुसूचित जातीसाठी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क योजना राबविण्यामध्ये सुलभता आणण्यासाठी शासन आता भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेमध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्याचे अधिकार विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याऐवजी शासकीय व अनुदानित मान्यताप्राप्त विद्यापीठ संलग्न उच्च माध्यमिक वर्ग / कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयांचे प्राचार्य यांना प्रदान करण्यास शासन मंजूरी देत आहे. त्यांनी शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्ती व सोबतच्या परिशिष्ट - १, २, ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार शिष्यवृत्ती रक्कम मंजूर करावयाची आहे. शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क मंजूर करण्याचे अधिकार पूर्वीप्रमाणेच विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना राहतील. तसेच मान्यताप्राप्त विना अनुदानित महाविद्यालयातील व परराज्यात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम पूर्वीप्रमाणेच विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे मंजूर करतील.

२. अटी व शर्ती :-

१ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शासकीय व मान्यताप्राप्त विद्यापीठ संलग्न अनुदानित उच्च माध्यमिक वर्ग / कनिष्ठ महाविद्यालय /महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी पुरविण्यात येणा-या माहिती पुस्तकासोबतच यापुढे भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काचे आवेदन पत्र जोडण्यात यावे.

२ सदर योजनेखाली नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित शिक्षण संस्थेची राहील.

३ विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी संबंधित कनिष्ठ महाविद्यालय/ महाविद्यालय यांच्याकडून तरतूदीची मागणी प्राप्त करुन घ्यावी व मागील वर्षातील खर्चाच्या ९० टक्के रक्कम तदर्थ अनुदाना-पोटी कोषागारातून पारीत करुन माहे जुलै अखेर पर्यंत महाविद्यालयांना वाटप करावी.



**Translated Version of Highlighted extract only.**

Government Decision: To bring easiness in the implementation of Government of India's Scholarship after Matric Scheme, Examination Fee Scheme, the Government, now, is **approving the rights, of sanctioning scholarship to the students of Government of India Scholarship after matric, to the principal of government and grantable colleges**/ Junior Colleges/ Higher Secondary Classes affiliated to the approved University instead of District Social Welfare Officer.

The rights of sanctioning the educational fee and examination fee will remain, as it was, with theSpecial District Social Welfare Officer.

Dadasaheb Jotiram Godse Arts, Commerce, Science College
VADUJ
Tal. Khatav
Dist. Satara

I/C Principal
Dadasaheb Jotiram Godse
Arts,Commerce,Science College,Vadu
Tal. Khatav, Dist. Satara (MH)

Scanned with CamScanner

Dadasaheb Jotiram Godse Arts, Commerce, Science College
VADUJ
Tal. Khatav
Dist. Satara

**Principal**
Dadasaheb Jotiram Godse
Arts,Commerce,Science College,Vaduj
Tal. Khatav Dist. Satara (MH)

Scanned with CamScanner

**English Translation of the Letter form the Government of Maharashtra regarding Govt. policy (work strategy) forScholarships :**

This document contains four pages in regional language and 16 points including introduction:

Decision taken by the Govt. is highlighted in the original document and translated into English which is as under:

**Government Decision:**With intention of bringing easiness in the implementation of Government of India's scholarships after matric scheme, examination fee scheme, the government now is **approving the rights of sanctioning scholarships to the students, to the principals of Government and Grant-in-Aid college** / Junior Colleges / Higher Secondary Schools affiliated to the approved universities, in place of District Social Welfare Officer. The rights of sanctioning educational fees and examination fees will remain as it is, with the Special District Welfare Officer.

IQAC Coordinator

Co-Ordinator – NAAC
Arts & Commerce College,
Vaduj ( Satara )

Seal

Dadasaheb Jotiram Godse Arts, Commerce, Science College • VADUJ Tal. Khatav Dist. Satara

Principal

I/c **Principal**
Dadasaheb Jotiram Godse
Arts,Commerce,Science College,
Tal. Khatav, Dist. Satara (MH

Scanned with CamScanner

# Dadasaheb Jotiram Godse

# Arts, Commerce and Science College, Vaduj

# Tal. Khatav, Dist. Satara

---

1. **Link for Scholarship Students 2015-16**

https://djgacscvaduj.org/upload/IQAC/SSRDoc/2015-16%20Merged%20Scho,EBC,Merit.pdf

**2. Link for Scholarship Students 2016-17**

2016-17 Merged Sch,EBC,Merit.pdf (djgacscvaduj.org)

**3.Link for Scholarship Students 2017-18**

2017-18 Merged Sch,EBC,Merit.pdf (djgacscvaduj.org)

**4. Link for Scholarship Students 2018-19**

2018-19 Merged Sch,EBC,Merit.pdf (djgacscvaduj.org)

5. Link for Scholarship Students 2019-20

2019-20 Merged Sch,EBC,Merit.pdf (djgacscvaduj.org)

Sd/-

Principal

Dadasaheb Jotiram Godse

Arts, Commerce and Science College, Vaduj